उपविभागीय अधिकारी
वर्धा

# उपविभागीय अधिकारी,वर्धा यांचे कार्यालय

**सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा**

Email- Sdowardha@gmail.com दुरध्वनी क्र. 07152- 242561

वाचा.1. अर्जदार श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा. बोरगांव त. जि. वर्धा यांचा दिनांक. 24/ 06/2019 चा अर्ज

2. या कार्यालयाकडून दिनांक. 27/06/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आलेला जाहीरनामा.
3. नगर रचनाकार,वर्धा यांचे कडील जा.क्र.अकृषक /मौजा तळेगाव (टा)/ ता.वर्धा /स.नं.1 व 173/ नरव/108/ 2020 सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत दिनांक. 14/ 01/2020 चा अंतीम मजुंरी अहवाल.
4. तहसिलदार,वर्धा यांचे कडील पत्र. क्र.अ.का./प्रस्तु-1 /कावि- 68/ 2019/ दिनांक. 09/01/2020 चा सदर शेतजमीन अकृषक करण्याबाबत अहवाल.
5. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,वर्धा यांचे पत्र./जा.क्र.- 423/आरे/का-2(8)/अकृषक/2019 दिनांक. 15/01/2020 चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल
6. कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग जि.प.वर्धा यांचे कडील पत्र.क्र/जिपव/बांध/तावि/बानि- 136/2020/ दिनांक. 14/01/2020 चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल.
7. प्रभारी अधिकारी, भुसंपादन वर्धा यांचे कडील पत्र.क्र/विभुअ/प्र.अ./कावि- 302/ 2019 दिनांक. 05/12/2019 चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल
8. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, वर्धा यांचे कडील पत्र /अ.का./पुनर्वसन /कावि- 685/2019/ दिनांक.26/07/2019 चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल
9. कार्यकारी अभियंता निम्न वर्धा कालवे विभाग वर्धा यांचे कडील पत्र./ जा.क्र.- 3145/ चिशा.3/अ.कृ. 2019/ दिनांक. 20/08/2019 चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल
10. उपकार्यकारी अभियंता वर्धा पाटबंधारे विभाग वर्धा यांचेकडील पत्र जावक क्र.2358/रेषा/355/अकृषक/2019 दिनांक. 05/09/2019 चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल
11. जिल्हा स्वास्थ अधिकारी, जि.प.वर्धा यांचे कडील पत्र. / No./ Dho / Uip / Site-Insp /34 - 86/ 2020 दिनांक. 15/01/2020 यांचा चा सदर शेतजमीनअकृषक करण्याबाबत अहवाल
12. ग्रामपंचायत मौजा तळेगाव (टा) ता.जि.वर्धा यांचे कडील पत्र दिनांक.20/8/2019 नुसार ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत मौजा तळेगाव (टा)ता.वर्धा जि.वर्धा यांचा सदर शेतजमीन अकृषक करण्याबाबत अहवाल

---

प्रकरण क्र.23 / एन.ए.पी-34/ 2018-19
मौजा. तळेगाव (टा) ता. वर्धा जि.वर्धा

विषय :- मौजा तळेगाव(टा)त.जि.वर्धा येथिल स.न.1आराजी1.13 हे.आर.व स.न.173 आराजी 1.13 हे.आर.एकुण आराजी 2.26 हे.आर.जमीनीस निवासी अकृषक परवानगीबाबत

## आदेश

(पारित दिनांक. 11 /02/ 2020)

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 44 नुसार व त्याअंतर्गत तयार केलेले नियम महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम 1969 नुसार**

उपविभागीय अधिकारी
वर्धा

ज्याअर्थी अर्जदार श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा.बोरगांव त.जि.वर्धा यांनी मौजा तळेगाव (टा) येथिल स.न. 1आराजी 1.13 हे.आर.व स.न.173 आराजी 1.13 हे.आर. एकुण आराजी 2.26 हे.आर. जमीन निवासी प्रयोजनासाठी अकृषक परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला.



Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे अवलोकनी घेता मौजा तळेगाव (टा) येथिल स.न. 1आराजी 1.13 हे.आर.व स.न.173 आराजी 1.13 हे.आर. एकुण आराजी 2.26 हे.आर. हि जमीन खातेदार श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा. बोरगांव त. जि. वर्धा यांना खरेदीहक्क लेखाव्दारे मिळालेली आहे. सदरची जमीन भोगवटदार वर्ग1 ची आहे.

**सदर जमीनीचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| मौजा | त.सा .क्र | शेत स. नंबर | आराजी (हे.आर) | | शेताचे हक्क | अकृषक करणाचे क्षेत्रफळ (हे.आर) | अकृष क वापर | शेतमालकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 7/12 प्रमाणे | मोजणी नकाशा प्रमाणे | | | | |
| तळेगाव (टा) ता. वर्धा जि.वर्धा | | 1<br>173 | 1.13<br>1.13 | 2.26 | भोग-1 | 2.26 | निवासी प्रयोजना करीता | श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा. बोरगांव त. जि. वर्धा |

ज्याअर्थी अर्जदाराने उपरोक्त तपशिलातील कृषक जमीनीचे रुपांतर अकृषक प्रयोजना करीता भू-परावर्तीत करण्याची परवानगी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कलम 44अंतर्गत मागीतल्यावरुन खालील प्रमाणे नियमानुसार कार्यवाही करण्यांत आली.

ज्याअर्थी या कार्यालयाचे पत्र क्र सिरस्तेदार/अकृषक/ कावि-4479/ दिनांक. 27/06/2019 अन्वये विवीध विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहे

आणि ज्याअर्थी प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार,वर्धा यांनी सदरची जागा तलाठी मौजा तळेगाव (टा) ता.वर्धा जि.वर्धा यांचे मार्फत स्थळ पाहणी, पंचनामा करुन त्यामध्ये जागेचा अकृषीक वापर सुरु नाही. सदरची जागा इनाम नाही तरी या जागेस निवासी अकृषक करणेस हरकत नाही. असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग वर्धा यांनी त्यांचे कडील दिनांक. 15/01/2020 चे अहवाला अन्वये प्रस्तावित जागा ही सुलतानपुर- तळेगाव- ऐकुर्ली या रस्त्यालगत अनागरी भागात येत असुन पत्रात नमुद अटि व शर्तीवर नाहरकत देण्यात येते असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी कार्यकारी अभियंता, बांध.वि.जि.प. वर्धा यांनी त्यांचे कडील दि. 14/01/2020 चे अहवाला अन्वये प्रस्तावित जागा या विभागाचे अंतर्गत येत असलेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्याचे क्षेत्रात येत नाही. सदर जागा ग्रामपंचायत मौजा तळेगाव (टा) ता.वर्धा जि.वर्धा यांचे हद्दीत येतअसल्याने त्यांची परवानगी घेण्यात यावी असा अहवाल सादर केला आहे.

आणि आणि ज्याअर्थी उपजिल्हाधिकारी, भुसंपादन (प्रभारी) वर्धा यांचा दिनांक. 05/12/2019 चेअहवाला अन्वये सदर शेतजमीन सद्यास्थितीत भुसंपादना करीता प्रस्तावीत नाही. परंतु शासनाच्या लोकहितार्थ प्रकल्पासाठी सदर जमीन यापुढे भुंसपादनखाली आल्यास किंवा खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करावयाची असल्यास नियमाप्रमाणे जमीनीचा वापर सुरु केले नसल्यास पडीत शेत जमीनीचे दर लागु राहील, अकृषक दर देय राहणार नाही, या अटिवर त्यामुळे नाहरकत परवानगी देण्यात यावी असा असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी जिल्हा पुनर्वसन अधिकारी वर्धा यांचेकडील दिनांक. 26/07/2019 अन्वये सदर शेत जमीन कोणत्याही प्रकल्प क्षेत्रात लाभ क्षेत्रात किंवा बाधित क्षेत्रात समाविष्ट नाही. त्यामुळे अकृषक परवानगी देण्यास हरकत नाही. असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी निम्न वर्धा कालवे विभाग वर्धा यांचेकडील दिनाक. 20/08/2019 चे पत्रान्वये सदर शेत निम्न वर्धा प्रकल्पाचे समावेश व लाभक्षेत्रात येत नाही. असा अहवाल सादर केला आहे

आणि ज्याअर्थी कार्यकारी अभियंता वर्धा पाटबंधारे विभाग यांनी त्यांचे कडील दि. 05/9/2019 चे अहवाला अन्वये सदरची जमीन ही या कार्यालयाचे अधिनस्त प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात येत नाही.असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी जिल्हा स्वास्थ अधिकारी वर्धा यांचेकडील दिनांक. 15/01/2019 चेअहवाला नुसार अकृषक परवानगी देण्यास हरकत नाही. असा अहवाल सादर केला आहे.

उपविभागीय अधिकारी वर्धा



Scanned with CamScanner

**सदर अकृषक जमीनीचा तपशिल व त्यावरील आकारणी खालील प्रमाणे आहे.**

| सर्वे क्रमांक | एकुण आराजी हे.आर. | एकुण आराजी चौ.मि. | अकृषक आराजी हे.आर | आराजी अकृषक चौ.मि. | प्रती चौ.मि. अकृषक आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 व | 2.26 | 22600.00 | 2.26 | 22600.00 | 10 पैसे प्रती चौ.मि. |
| एकुण आराजी सर्वे क्रमांक 1 | | | | | 11300.00 चौ.मि. |
| एकुण आराजी सर्वे क्रमांक 173 | | | | | 11300.00 चौ.मि. |
| प्रत्यक्ष अकृषक जमिनीचे क्षेत्र | | | | | 22600.00 चौ.मि. |
| रस्त्या खालील क्षेत्र | | | | | 8465.31 चौ.मि. |
| खुल्या जागेचे क्षेत्र | | | | | 2260.85 चौ.मि. |
| भूखंडाखालील क्षेत्र | | | | | 9611.39 चौ.मि. |
| Aminity Plot No.86 | | | | | 1705.40 चौ.मि |
| Aminity Plot No.87 | | | | | 557.05 चौ.मि |

**भूखंडाचा तपशिल**

| भूखंड क्रमांक | एकुण भूखंड | भूखंडाचे क्षेत्र | भूखंडाचे एकुण क्षेत्र | भूखंडाहिाय अकृषक सारा |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 303.57 | 303.57 | 30.36 |
| 2 | 1 | 263.25 | 263.25 | 26.33 |
| 3 | 1 | 264.07 | 264.07 | 26.41 |
| 4 | 1 | 126.70 | 126.70 | 12.67 |
| 5 ते 8 | 4 | 74.20 | 296.80 | 29.68 |
| 9 ते 10 | 2 | 133.95 | 267.90 | 26.79 |
| 11 | 2 | 131.25 | 131.25 | 13.13 |
| 12 | 1 | 233.10 | 233.10 | 23.31 |
| 13 | 1 | 171.05 | 171.05 | 17.11 |
| 14 | 1 | 133.95 | 133.95 | 13.40 |
| 15 ते 18 | 4 | 74.20 | 296.80 | 29.68 |
| 19 | 1 | 152.60 | 152.60 | 15.26 |
| 20 | 1 | 176.40 | 176.40 | 17.64 |
| 21 ते 24 | 4 | 74.20 | 296.80 | 29.68 |
| 25 | 1 | 133.95 | 133.95 | 13.40 |
| 26 | 1 | 130.45 | 130.45 | 13.01 |
| 27 ते 30 | 4 | 72.80 | 291.20 | 29.12 |
| 31 | 1 | 213.85 | 213.85 | 21.39 |
| 32 | 1 | 131.95 | 131.95 | 13.20 |
| 33 | 1 | 95.50 | 95.50 | 9.55 |
| 34 | 1 | 100.64 | 100.64 | 10.06 |
| 35 | 1 | 123.62 | 123.62 | 12.36 |
| 36 | 1 | 126.20 | 126.20 | 12.62 |
| 37 ते 40 | 4 | 86.80 | 347.20 | 34.72 |
| 41 | 1 | 128.70 | 128.70 | 12.87 |
| 42 | 1 | 153.95 | 153.95 | 15.40 |
| 43 ते 48 | 6 | 88.75 | 532.50 | 53.25 |
| 49 | 1 | 165.79 | 165.79 | 16.58 |
| 50 | 1 | 133.15 | 133.15 | 13.32 |
| 51 ते 56 | 6 | 96.25 | 577.50 | 57.75 |
| 57 | 1 | 133.15 | 133.15 | 13.32 |
| 58 | 1 | 119.93 | 119.93 | 12.00 |
| 59 | 1 | 80.50 | 80.50 | 8.05 |

विभागीय अधिकारी
वर्धा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 60 | 1 | 78.75 | 78.75 | 7.88 |
| 61 | 1 | 73.50 | 73.50 | 7.35 |
| 62 | 1 | 69.30 | 69.30 | 6.93 |
| 63 | 1 | 71.41 | 71.41 | 7.14 |
| 64 | 1 | 68.45 | 68.45 | 6.84 |
| 65 | 1 | 120.78 | 120.78 | 12.08 |
| 66 | 1 | 123.30 | 123.30 | 12.33 |
| 67 ते 70 | 4 | 88.40 | 353.60 | 35.36 |
| 71 | 1 | 130.00 | 130.00 | 13.00 |
| 72 | 1 | 128.38 | 128.38 | 12.84 |
| 73 ते 76 | 4 | 94.90 | 379.60 | 37.96 |
| 77 | 1 | 129.48 | 129.48 | 12.95 |
| 78 | 1 | 142.19 | 142.19 | 14.22 |
| 79 ते 84 | 6 | 127.30 | 763.80 | 76.38 |
| 85 | 1 | 144.89 | 144.89 | 14.49 |
| Aminity Plot No 86 | 1 | 1705.40 | 1705.40 | 170.54 |
| Aminity Plot No 87 | 1 | 557.05 | 557.05 | 55.71 |
| एकुण | 88 | | 11873.84 | 1187.38 |

**अकृषक जमिनीवरील आकारणी**

| आकारणी | रूपये | भरणा करण्याचा तपशील | नियम |
|---|---|---|---|
| अकृषक | 1188.00 | प्रतीवर्ष | कलम 110 |
| जिल्हा परिषद | 8316.00 | प्रतीवर्ष | कलम 110 |
| ग्राम पंचायत | 1188.00 | प्रतीवर्ष | कलम 110 |
| परावर्तीत कर | 5940.00 | एकदाच | कलम 47 अ |
| **एकुण आकारणी** | **16632.00** | | |

आणि ज्याअर्थी ग्रामपंचायत मौजा तळेगाव (टा) ता.जि.वर्धा यांचे कडील पत्र दिनांक. 20/08/2019 नुसार ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत मौजा तळेगाव (टा) ता.जि.वर्धा यांचे अहवालानुसार सदर शेत हे निवासी अकृषक करणेकरीता आवश्यक असलेल्या सुविधा पूर्ण करुन देण्याच्या व पत्रात नमुद अटी व शर्तीला अधिन राहुन सदर शेतजमीनीला अकृषक परवानगी देण्यास यावी असा अहवाल सादर केला आहे. सदर शेतजमीनीलाअकृषक परवानगी देण्यास यावी असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी संदर्भादिन जमीन ग्रामीण भागामध्ये तसेच मौजा तळेगाव (टा) ता.वर्धा जि.वर्धा जिल्हा परिषद 5 किमी परिघात मध्ये येत असल्याने रु.10 पैसे प्रति दराने होणारे बिगरशेती सारा रुपये 1188/- जि.प.उपकर रुपये 8316/- ग्रा.प कर रुपये 1188/- रुपांतरीत कर रुपये 5940/-अशी एकुण रक्कम रुपये 16632/- सरकारी खजिण्यात जमा करावी.

आणि ज्याअर्थी नगर रचनाकार वर्धा यांचे कडील पत्र क्र. 1306/ दि. 24/07/2019 नुसार सिमांकनाची शिफारस करण्यात आलेली असुन दिनांक. 04/03/2017 चे निर्देशानुसार उक्त प्रकरणी 15 % अधिमुल्याची रक्कम रु.3,15,200/- शासकिय खजिन्यात चलान क्रं. 4326708 दिनांक. 24/07/2020 रोजी जमा केले आहे. शासनाचे दि. 10/02/2010 चे निर्देशानुसार जमीन धारकाने अभिन्यास छाननी शुल्क रु. 3000/- शासकिय खजिन्यात चलान क्रं. 3772118/ दिनांक. 08/07/2019 रोजी जमा केले आहे. वर्धा प्रदेशाकरीता प्रादेशिक योजना मंजुर झालेली असल्याने त्यामधील विकास नियंत्रन नियमावलीचे तरतुदीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी विकास शुल्काची रक्कम रु. 86,800/- शासकिय खजिन्यात चलान क्रं.10670788/ दिनांक. 14/01/2020 रोजी जमा केले आहे. प्रकरणात सादर अभिन्यास नकाशाची छाननी केला असता सिमांकित अभिन्यास नकाशे साधारणपणे योग्य असल्याने सिमांकीत नकाशास त्यांचे कडील संदर्भ पत्र क्रं.3 जा.क्र.अकृषक/ मौजा तळेगाव (टा)/ ता.वर्धा / स.नं. 1 व 173/ नरच/108/ 2020 दिनांक. 14/01/2020 यात नमुद अटीवर अंतीम मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे असा अहवाल सादर केला आहे.

उपविभागीय अधिकारी
वर्धा



Scanned with CamScanner

त्याअर्थी वरील सर्व बाबी विचारात घेवून मौजा तळेगाव(टा) येथिल स.न.1आराजी 1.13 हे.आर.व स.न.173 आराजी 1.13 हे.आर. एकुण आराजी 2.26 हे.आर.कृषक जमीन निवासी अकृषक प्रयोजनाकरीता भु-परावर्तीत करण्याची परवानगी देण्याबाबत **मी, सुरेश बगळे उपविभागीय अधिकारी, वर्धा** महाराष्ट्र जमीन अधिनियम 1966 कलम 44 नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन अर्जदार श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा. बोरगांव त. जि. वर्धा यांचे मालकी व कब्जयातील मौजा तळेगाव (टा) येथिल स.न.1आराजी 1.13 हे.आर.व स.न.173 आराजी 1.13 हे.आर. एकुण आराजी 2.26 हे.आर.जमीन निवासी अकृषक प्रयोजनासाठी अर्जदार श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा. बोरगांव त. जि. वर्धा यांना कृषक जमीनीस निवासी अकृषक प्रयोजनाकरीता भु-परावर्तीत करण्याबाबत आदेशात नमुद केलेल्या संबधीत विभागाच्या अटी व शर्तीना अधीन राहुन तसेच खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहुन आदेश पारीत करीत आहे.

## शर्ती व अटी

1) नगर रचनाकार, वर्धा यांचे पत्र दिनांक. 14/01/2020 मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती अर्जदारास बंधनकारक राहतील. तसेच इतर विभागाने सुचना केल्याप्रमाणे सर्व अटीचे पालन करावे लागेल
2) ज्या विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले नाही ते प्राप्त करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील ती सादर न केल्यास काही वाद उपस्थित झाल्यास मंजुरी रद्द करण्याचे अधिकार या कार्यलयास राहतील.
3) अर्जदारांवर भारतीय वीज नियम बंधनकारक राहतील. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील ना हरकत दाखला उपलब्ध करुन घेणे व त्यातील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहतील.
4) अर्जदार यांनी म.रा.वि.मं.आ.इ नियम (79) 1956 प्रमाणे वीज तारेबाबत योग्य अंतर ठेवावे लागेले.
5) अर्जदारास ज्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्याची परवानगी दिलेली आहे. त्यासाठीच जमिनीच्या तिच्यावरील इमारतीसह वापर करील आणि उपविभागीय अधिकारी यांचे परवानगी शिवाय त्या जमिनीचा तिच्यावरील इमारतीसह वापर इतर कोणत्याही प्रायोजनासाठी करणार नाही.
6) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 व त्याखालील नियमाच्या तरतुदीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.
7) अर्जदाराला हा आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाचे आत मंजूर केलेल्या रेखांकनातून संबंधीत स्थानिक प्राधिकरण व उपविभागीय अधिकारी यांना योग्य वाटत असतील असे रस्ते, नाल्या तयार करुन त्या जमिनीचा विकास करता येईल.
8) वेळोवेळी कालावधीत वाढ करण्यात आली नसेल तर अर्जदाराने एक वर्षाच्या कालावधीच्या आत जमीनीचा अकृषिक वापर (एन.ए वापर) करण्यास सुरुवात करावी असे न केल्यास परवानगी रद्द करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.
9) जमिनीचा अकृषिक वापर करण्यास प्रारंभ केलेची तारीख अर्जदार तलाठया मार्फत तहसिलदाराला एक महिन्याच्या आत कळविल असे न केल्यास महाराष्ट्र महसुल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकरणी) नियम 1969 6 अन्वये कार्यवाही करण्यास पात्र असेल.
10) अर्जदार या आदेशाच्या तारखेपासून शासनाने विहीत केलेल्या प्रत्येक चौरस मिटर रुपये 0.10 पैसे या प्रमाणे जमिनीच्या संबंधातील अकृषिक आकारणीचा हमी कालावधी असून समाप्त व्हावयाच्या आहे. ही वस्तु स्थिती विचारात न घेता वेगवेगळया दराने अकृषिक आकारणी वसूल करणेत येईल.
11) अर्जदार, जमिनीचा अकृषिक वापर करण्यास परवानगी मिळाल्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या कालावधीत त्या जमीनीवर कायम स्वरुपाचे इमारती बांधकाम करु शकेल.
12) प्रस्तुत रेखांकनाखाली क्षेत्रास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतूदीनुसार व त्यामध्ये झालेल्या सुधारणानुसार विकास आकार भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील व तो महसुल विभागाचे स्तरावरुन वसुल करण्यात यावा.
13) सदर शेताचा वर नमुद केलेल्या प्रयोजनाकरीताच वापर करण्यात यावा, दुसऱ्या इतर प्रयोजनाकरीता वापर करु नये.
14) अभिन्यासातील भुखंडाचे आंतर विभाजन करण्यांत येवू नये. भूखंडाचे विभाजन अथवा एकत्रिकरण करण्याकरीता उपविभागीय अधिकारी यांची नियमानुसार परवानगी घेणे बंधनकारक राहील.
15) शासनाकडील निर्देशाचे अनूषंगाने प्रचलीत नियमावली तरतूदी नूसार विकास शुल्काचा भरणा संबधीत नियोजन प्राधिकरणाकडे करणे अर्जदाराला बंधनकारक राहील.
16) अकृषक परवानगीचे आदेश पारीत झाल्याचे तारखेपासुन अभिन्यासात दर्शविलेली 2260.85 चौ.मि. मोकळी जागा ही व्यवस्थापना करीता ग्रामपंचायत मौजा तळेगाव (टा) ता.वर्धा जि.वर्धा यांचेकडे सार्वजनिक उपयोगाकरीता विहीत

उपविभागीय अधिकारी
वर्धा



Scanned with CamScanner

करण्यात येत असुन जमीन धारकाने अथवा इतर कोणीही या जागेची विक्री केल्यास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 अंतर्गत दंडनिय कार्यवाही करण्यात येईल. तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

17) रेखांकनाची जागेवर प्रत्यक्ष आखणी झाल्यानंतर त्यातील रस्ते, आजुबाजूच्या जमीनीतील रेखांकने मंजूर झालेली असतील तर त्यातील रस्त्याचा समन्वय (को-ऑर्डीनेशन) उपअधिक्षक,भुमी अभिलेख वर्धा यांचे अभिलेखाप्रमाणे साधने आवश्यक आहे.

18) रेखांकनातील रस्ते हे सर्वांना वापरण्यासाठी खुले राहतील व ते सार्वजनिक जाण्यायेण्याचा मार्ग म्हणून उपयोगात व वापरात राहतील.

19) रेखांकनातील कोणत्याही भूखंडामध्ये बांधकाम करण्यापूर्वी त्याबाबतचे सविस्तर बांधकाम नकाशे अंतिम रेखांकनासह शासनाच्या ग्रामविकास विभागकडील निर्णय क्र. व्हीपीएम-2015/प्रक्र.39/पं.स4. दि.11 डिसेंबर,2015 मध्ये नमुद केल्याप्रमाणेच्या कार्यपध्दतीनुसारच्या सक्षम प्राधिकरणामार्फत सादर करुन या कार्यालयाकडून मंजूर करुन घेण्याचे आहेत. त्याशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

20) अर्जदारांवर दी एक्टचे नियम बंधनकारक राहतील. तसेच रेखांकन हद्दीतील विकास करताना कोणत्याही प्रकारची झाडे तोडली जाणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने स्वदेशी प्रजातीची प्रती हेक्टरी किमान 100 (शंभर) या प्रमाणात झाडे लावून त्यांचे संगोपण करणे आवश्यक आहे.

21) सेवा रस्ता / इमारत रेषा / नियंत्रण रेषा इत्यादीबाबत महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र. आरबीडी-1081/871 रस्ते-7 दिनांक. 09 मार्च,2001 व त्यानंतरची उक्त संदर्भातिल वेळोवेळी निर्गमित झालेल्या परिपत्रकामधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

22) प्रकरणासोबत प्राप्त कागदपत्राच्या आधारे प्रस्तावाची छाननी करण्यात आली आहे. सह हिस्सेदार यांचे सन्मती पत्र व प्रस्तावीत रेखांकनामध्ये दर्शविलेल्या अर्जदार यांच्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत/हद्दीतील काही कायदेशीर बाबी उद्धवल्यास त्यास अर्जदार स्वत:जबाबदार राहील आणि त्यांचे निराकारक अर्जदाराने परस्पर स्वखर्चाने करावयाचे आहे.

23) वेळोवेळी शासनाने ठरविलेल्या अकृषक आकारणीचा भरणा करणे अर्जदाराला बंधनकारक राहील.

24) अभिन्यासातील पोच रस्ते,अंतर्गत रस्ते,नाली,पाण्याची व्यवस्था,कल्व्हर्ट,पुल,रस्त्याचे बाजुस विजेचे पोल व इतर आवश्यक सार्वजनिक सुविधा विकसीत करणे आवेदकावर बंधनकारक राहील.तसेच अभिन्यासातील सदर विकास कामे पूर्ण करुन ती संबधीत स्थानिक / नियोजन प्राधिकरणास विनामुल्य हस्तातरीत करणे बंधनकारक राहील.

25) अभिन्यासाची जागेवर आखणी करीत असतांना कोणत्याही परिस्थितीत सक्षम अधिकाऱ्याचे पूर्व परवानगी शिवाय मंजूर अभिन्यासात बदल करण्यात येऊ नये. भुखंड व खुल्या जागेचे क्षेत्र अथवा मोक्यावरील स्थान बदलवण्यात येऊ नये.असे आढळुन आल्यास अकृषक परवानगी तत्काळ प्रभावाने रद्द समजण्यात येईल.

26) उपरोक्त अकृषक जमीनीवरील 1 ऑगस्ट पासुन सुरु होणाऱ्या दर वर्षाला नियमानुसार अकृषक कर व त्यावरील प्रचलित दरानुसार जिल्हा परिषद सेस व ग्रामपंचायत सेस वसुल केल्या जाईल. वरील कराची आकारणी नगर रचनाकार वर्धा यांनी अनुमोदीत करुन दिलेल्या अभिन्यासानुसार राहील.

27) वरील शर्ती व अटींची पुर्तता वर नमुद केलेल्या विहीत मुदतीत न केल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यांत येईल.

28) या अभिन्यासातील भूखंडांची विक्री करतांना अकृषक आदेश व मंजूर अभिन्यास नकाशा जोडणे बंधनकारक राहील तसेच तो विक्रीपत्राचा एक भाग समजण्यात येईल.

29) जागेचे मालकी हक्क अभिन्यासाच्या हदी व क्षेत्रफळाबाबत तसेच पोचरस्त्याबाबत काही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रदद समजण्यात येईल.

30) उपयोक्त नमूद अटी व शर्ती शिवाय शासनाकडुन वेळोवेळी लागू केलेले सर्व नियम व अटी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

31) कोणतेही वेळी आढळून आले की, अर्जदार यांनी चुकीची अथवा दिशाभुल करणारी माहिती दिलेली असेल तर रेखांकनाला दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

उपविभागीय अधिकारी
वर्धा

अर्जदाराला महाराष्ट्र जमीन महसुल (जमिनीच्या वापरात बदल आणि अकृषिक आकारणी) नियम 1969 ला जोडलेल्या अनुसुची चार/पाच मध्ये असलेल्या नमुन्यात जमिनीच्या अकृषिक वापरात प्रारंभ करण्याच्या संबंधातील सर्व शर्ती सनदेमध्ये सनिदिष्ठ करुन सनद करुन देणे बंधनकारक असेल.

अ) प्रतिगृहीताने (अर्जदाराने) या आदेशामध्ये आणि सनदेमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास संहितेच्या तरतूदी अन्वये ज्या शिक्षेस तो पात्र असेल अशा इतर कोणत्याही शर्तीला बांधा न आणता उपविभागीय अधिकारी, निर्देश देतील अशा दंडाच्या आणि आकारणीच्या रक्कमेच्या भरणा केलेवर जिल्हाधिकारी वर्धा उक्त जमीन अर्जदारांच्या ताब्यात असल्याचे चालू ठेवतील.



Scanned with CamScanner

ब) उक्त खंड (अ) मध्ये काहीही नमूद केलेले असेल तरी उपविभागीय अधिकारी यांचेकडून त्यासंबंधात विनिदीष्ठ करण्यात येईल अशा वेळेत या मंजुरीच्या तरतूदीचे उल्लंघन करुन उभारलेली कितीही वापरण्यात येणारी कोणतेही इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याच्या किंवा फेरबदल करण्याचा निर्देश देणे हे उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी कायदेशीर ठरेल व काढून टाकलेल्या किंवा फेरबदल केलेल्या बांधकामाचे विटामातीचे तुकडे विनिर्दीष्ट वेळेत हटविण्याच्या खर्च अर्जदारांकडून जमीन महसूल थकबाकी असल्याप्रमाणे वसुल करण्यात येईल. परवानगी देणे हे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदीच्या आधीन आहे. आणि तो प्रकरणांशी संबंधीत इतर अधिनियमांना म्हणजे उदा. मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, नगरपालिका अधिनियम इ.ना लागु असेल.

**वरील शर्ती व अटीला अधिन राहून आदेश पारीत संबधीतांना कळवा.**

उपविभागीय अधिकारी वर्धा

स्वा/-
( सुरेश बगळे )
उपविभागीय अधिकारी
वर्धा

**प्रतिलिपी :-**

1. अर्जदार श्री. सुधाकर पांडुरंगजी साटोणे इतर - 4 रा.बोरगांव त.जि.वर्धा यांना आदेश व अनुमोदीत अभिन्यास नकाशासह माहिती करीता अग्रेषित
2. तहसिलदार वर्धा यांना आदेश व अनुमोदीत नकाशासह अग्रेषित. त्यांनी तालुका नमुना- 2 मध्ये नोंदी घेण्यास सबंधीत तलाठयास सुचना द्याव्यात व आदेशात नमुद केल्यानुसार अकृषक कर व इतर उपकराची वसुली नियमानुसार करावी.
3. तलाठी मौजा तळेगाव (टा) ता.जि.वर्धा यांना गांव नमुना - 2 मध्ये नोंद घेण्याकरीता अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की,त्यांनी अभिन्यासातील खुल्या जागेचा जिल्हाधिकारी वर्धा यांचे पत्र क्र.अका/नझुल/कावी- 835/2001 दि. 28/8/2001 अन्वये शासनाचे नावाने 7/12 वेगळा करुन तशी नोंद घ्यावी.
4. उप अधिक्षक, भुमि अभिलेख वर्धा यांना माहीती करीता अग्रेषित.
5. सचिव ग्रामपंचायत तळेगाव (टा)ता.वर्धा जि.वर्धा यांना माहीतीकरीता अग्रेषित. सदर अभिन्यासा प्रमाणे 2260.85 चौ.मि. खुली जागा व्यवस्थापनाकरीता प्रचलित नियमानुसार सार्वजनिक उपयोगाकरीता ग्रामपंचायतचे ताब्यात घ्यावी व तीची देखरेख करावी. सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही तसेच सदर जागेचा दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी.
6. निवड नस्ती

( सुरेश बगळे )
उपविभागीय अधिकारी,
वर्धा



Scanned with CamScanner